**प्रेसनोट** **दि.२७/०३/२०१९**

## वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर

## १० वर्षाचे मतीमंद मुलास पालकाचे ताब्यात दिले.

दि.२७/०३/२०१९ रोजी पोलीस शिपाई,सुदर्शन शंशिकांत म्हागंरे व पोलीस शिपाई,दत्तात्रय बबन गावडे असे महंमदवाडी मार्शलवर कर्तव्यावर असताना,त्यांना पोलीस नियंत्रण कक्ष,पुणे शहर येथून कॉल आला व कळवीले की, एक मतिमंद मुलगा सैय्यदनगर, रेल्वेगेट येथे सापडला आहे असा कॉल प्राप्त होताच सदर कर्मचारी सदर ठिकाणी पोहंचले असता,त्यांना १० वर्षाचा मतीमंद मुलास तेथील नागरीकांनी ताब्यात दिल्याने त्यांनी त्यास प्रथम पोलीस चौकी येथे आणले व महंमदवाडी पोलीस चौकीचे डयुटी अंमलदार पोलीस हवालदार,विनोद विश्वनाथ पोतदार यांचेकडे हजर केल्याने, पोतदार यांनी प्रथम त्यास खाण्या पिण्यास देवुन,स्वतः मार्शलचे वरील कर्मचारी यांनी सदर मुलास सोबत घेऊन हांडेवाडी रोड, तरवडे वस्ती, गुलामअली नगर, चिंतामणी नगर, सैय्यदनगर भागात फिरून स्थानिक नागरिंकाना सदर मुलाबाबत माहिती विचार फिरत असताना त्यांना सदर मुलगा हा सय्यदनगर गल्ली नं.७ या ठिकाणाचा असल्याची माहिती मिळाल्याने,त्यांनी गल्ली नं.७ या ठिकाणी जाऊन सदर मुलाचे पालकांचा शोध घेतला असता,सदर मुलाचे पालक मिळून आल्याने,त्या मुलाचे पालकांबाबत खात्री पटवून,सदर मुलास मुलाची आई यांचे ताब्यात सुखरूप दिले असता,त्यांनी त्याबाबत वानवडी पोलीसांचे आभार मानले.

(सुनिल वि.भोसले)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
वानवडी पोलीस स्टेशन पुणे